# ग्राम पंचायत वडेगाव बंध्या
# पंचायत समिती अर्जुनी/मोर
# ई-निविदा सुचना (पहीली वेळ)

ई- निविदा क्र.- ०१

जा.क्र-/ ०१ /ग्रा.प.वडेगाव बंध्या/ई निविदा /२६
दि. १४/०५/२०२६

---

ग्रामपंचायत वडेगाव बंध्या. पंचायत समिती अर्जुनी/मोर जि.गोंदिया कडुन हया व्दारे सर्व सबंधीतांना सुचित करण्यात येते की,सदर ग्रा.पं. मध्ये सन २०२६-२७ हया आर्थिक वर्षात विविध विकास कामे करणे अंतर्गत विविध योजनाच्या बांधकामे करण्याकरीता संबधीत साहीत्य पुरवठाधारक कडुन पुरवठा करण्यासाठी व्दि लिफापा पध्दतीने खालिल साहीत्य पुरवठा करण्याकरीता ई-निविदा खालिल अटी व शर्ती च्या अधिन राहुन मागविण्यात येत आहेत.

सदर ई निविदा चे दर दि. १५/०५/२०२६ ला ९.०० वाजे,पासुन दि २१/०५/२०२६ ला ०५.०० वाजे पर्यंत भरता येईल. सदर ई-निविदा दिनांक २२/०५/२०२६ ला १२.३० वाजता उघडण्यात येईल.

सदर ई-निविदा ची विस्तुत माहीती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध असुन विस्तुत माहिती ग्रा.पं. कार्यालयात उपलब्ध आहे.

## अटी व शर्ती-

१) नोंदणीकृतपुरवठाधारकांनी अधिकृत डि. एस. सी. प्राप्त करून घेउन महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन केवळ ई – निविदा पध्दतीने सादर करावी. I) महाराष्ट्र दुकाने व आस्थपना अधिनियम,२०४८,२०६१ नुसार नोदणी प्रमाणपत्र,II) वस्तु व सेवा कर पंजीयण नोंदणी प्रमाणपत्र ट्रेडर्स नाव असलेले. अशा पुरवठाधारकाकडुन ई-निविदा व्दि लीफापा पदधतीने मागविण्यात येत आहे.

२) **प्रथम लिफाप्यात** पुरवठा धारकांनी बँकेत जमा केलेल्या अमानत रक्कमेची पावती व ई निविदा फार्माची फी भरल्याची पावती, तसेच I) महाराष्ट्र दुकाने व आस्थपना अधिनियम,२०४८,२०६१ नुसार नोंदणी प्रमाणपत्र, II) ट्रेडर्स नावे वस्तु व सेवा कर (GST)पंजीयण नोंदणी मुळ प्रमाणपत्र III) व्यवसाय कराचे क्लिअरन्स प्रमाणपत्र (सन २०२२-२३) IV) आयकर रिर्टन व सेलटॅक्स क्लिअरंस प्रमाणपत्र (२०२२–२३) V) पहिल्या व शेवटच्या पानावर डिजीटील स्वाक्षरी केलेली पारुप निविदा नोटीस (DTP) सादर करावे.VI) साहीत्य खरेदी – विक्री चे विवरण पत्र. सर्वप्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे अनिवार्य आहे.

३) सदर निविदा ई-निविदेच्या दिनांकापासुन ३० एप्रील २०२७ पर्यंत वैध राहील.

४) ई-निविदा फार्मची किंमत ५०० रू. व पोर्टल फी ऑनलाईन ने ५०० = १००० अनामत रक्कम ३००० रू.**:- सामान्य फंड येथे नमुना ७ ने** जमा करावी. निविदामंजूर पुरवठाधारक यांची अनामत रक्कम निविदा कालावधी पर्यंत ग्रा. प. कडे जमा राहील, त्यानंतर ग्रामपंचायत कडे अनामत रक्कम परत मागणी करीता अर्ज सादर केल्या शिवाय परत करण्यात येणार नाही.अनामत रक्कम ग्रा. प. कार्यालयात येउन चेकव्दारे घ्यावेत.

५) रक्कम जमा केल्याची पावती निविदे सोबत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

६) साहीत्य पुरवठा करतेवेळी साहीत्य आवश्यक त्या परवान्यासह तसेच रॉयल्टीसह कामाच्या ठिकाणी पोहचते करावे लागेल.

७) **लिफापा क्रमांक २** मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.सोबत दर पत्रकात GSTचेस्वतंत्र दर रूपये मध्ये नमुद करावेत याची सर्व पुरवठा धारकांनी नोंद घ्यावी.

८) पहील्या लिफाप्यामध्ये दस्तावेज परीपुर्ण असल्यासचं दुसरा लिफापा उघण्यात येईल.

९) साहीत्या ची गुणवत्ते बाबद सक्षम तांत्रीक अधीकारी यांचे निर्णय अंतीम असेल .

१०) कामाचे देयक मोजमाप पुस्तकात नोंदी झाल्यावर, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळाल्यावर, पंचायत समिती/जि. प. कडुन निधी प्राप्त झाल्यावर, ग्रामपंचायतच्या मंजुरी नंतर धनादेशाव्दारे वितरीत करण्यात येईल.

११) ग्रामपंचायतिच्या विविध विकास कामानुसार ग्रा. प. ने पुरवठा आदेश दिल्यावर पाच दिवसाचे आत साहीत्य पुरवठा करावा लागेल. अन्यथा ई-निविदा रद्द करण्यात येईल.वसदर पुरवठाधारकास काळयायादीत समावेश केले जाईल.

१२) साहीत्य पुरवठा करीता कुठलाही ॲडवान्स (अग्रीम) मिळणार नाही.

१३) मुरूम, आर सी.सी.पाईप , गिटी 40/20 mm (काळी) , सिमेन्ट (ISI), रेती याचे टेस्ट रीपोर्ट सादर करावे लागेल त्याशिवाय देय्यक मिळणार नाही. तसेच गौण खनिज परवाना साहीत्य पुरवठा करते वेळी ग्रामपंचायतीच्या नावाने दयावा लागेल. त्याचप्रमाणे सादर करावयाची सर्वदेयके GSTची असावीत.

१४) साहीत्य पुरवठा करतांना साहीत्याचे (DM) डिलेव्हरी मेमो सोबत पाठवावे लागेल.

१५) पुरवठा करण्यात येणारा साहीत्याचे निविदेत नमुद स्पेशिफीकेशन चा असने आवश्यक आहे.

१६) **ई- निविदेत नमुद करावयाचे दर हे सर्व साधारणत: अंदाज पत्रकीय दरासोबत समकक्ष असावेत. तुलनात्मक तक्ता मधील बाजारभावाचे दरापेक्षा १०% कमी किंवा जास्त असलेल्या दरांचाच विचार करण्यात येईल व त्यानुसार निविदा मंजुर करण्यात येईल.**

१७) बाजार दरातील तफावतीनुसार वाढीव दर अनुज्ञेय राहणार नाही.

१८) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारने अथवा नाकारण्याचा अधीकार सरपंच तथा ग्राविअ/ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय वडेगाव बंध्या. यांनी राखुन ठेवलं आहे. तसेच निविदा कालावधी कमी करणे अथवा वाढविण्याचे अधिकार ग्रामपंचायत स्वत: कडे राखुन ठेवत आहे.

१९) निविदा मंजूर झाल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालायासोबत १०० रूपये स्टॅम्प पेपर वर करारनामा करावा लागेल.

२०) निविदा मंजूर झाल्यानंतर सदर दिलेल्या दरपत्रकानुसारच सलग ३० एप्रील २०२७ पर्यंत साहीत्य त्याच दराने पुरवठा करावा लागेल. तशेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रंमांक बीडीजी २०१६/प्र. क्र. २/इमा. दिनांक १२/०२/२०१६ चे नियम पाळणे बंधनकारक आहे.

२१) ०१/१०/२०१८ पासुन करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाच्या प्रदानातुन **२ % TDS** वजा करण्यात येईल. त्यासाठी शासन परीपत्रक क्र. संकिर्ण २०१८/पं.क्र.१४४/२०१८/कोषा प्रशा-५ दि. २८ सप्टें २०१८. वाचावेत.

२२) अधीक माहीतीसाठीग्रामपंचायत कार्यालय वडेगाव बंध्या. येथे कार्यालयीन वेळेत सम्पर्क साधावा. तसेच आपत्तीबाबत लिखीत स्वरूपात निविदा प्रसिध्दी केल्यापासुन २ दिवासच्या आत ग्रा. पं. कार्यालयास कळवावे. अन्यथा आपले कोणत्याही प्रकारचे म्हणने विचारात घेतले जाणार नाही, याची पुरवठाधारकांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| **सरपंच** | **उपसरपंच** | **ग्राविअ /ग्रामसेवक** |
| **ग्रामपचायत कार्यालय** वडेगाव बंध्या. | **ग्रामपचायत कार्यालय** वडेगाव बंध्या. | **ग्रामपचायत कार्यालय** वडेगाव बंध्या |

Signature Not Verified
Digitally signed by Vijay Manohar Khune
Date: 2026.05.14 15:07:06 IST
Location: Maharashtra-MH